**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. १३९/२०२१</u>**

**सी.एन.आर.क्र.एम.एच. टी.एच.१७००२२६१२०२१**

**ठकीबाई विरुध्द प्रकाश**

**<u>निशाणी क्र.०५ खाली संयुक्तीक आदेश</u>**

(दिनांक १२/०१/२०२३)

-------------------------------------------

**०१.** वादींनी प्रतिवादीं विरुध्द हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२** वादींचे थोडक्यात कथन असे आहे की, मथीबाई पांडया भुतकडे हिला रामा नावाचा मुलगा होता. वादी हे रामाचे वारस आहेत. प्रतिवादी हे मयत गोविंद नारायण संखे यांचे वारस आहेत.

**०३.** वादींचे पुढे असे कथन आहे की, मौजे बोईसर दांडीपाडा येथील जुना सर्वे क्र. २१ म्हणजेच नवीन सर्वे नं. ७३/१, ७३/२ क्षेत्र ०-९६-९ हे. आर., पो.ख. ०-१०-३ हे. आर. असे एकुण १-०६-०२ हे. आर. हि जमिन (यानंतर **सदर जमीन** असा उल्लेख) मयत मथीबाईची संरक्षीत कुळाची होती. व्रजलाल नरसीलाल यांच्या मिळकतीत ती कुळ म्हणून वादीच्या पुर्वजाच्या व वादीच्या मदतीने कसत होती व भाताचे स्वरुपात खंड देत होती. पुढे संरक्षीत कुळ म्हणून फेरफार क्र.५७० दिनांक २०/१२/१९४९ रोजी तिच्या नावाने मंजूर झाला. ती व वादी आदिवासी समाजाचे आहेत. तसेच कृषक दिना दिवशी ती संबंधीत कायदयानुसार कुळ खरेदीदार झाली व होती. म्हणून वादी हे वाद जमिनीचे वाद खरेदीदार झाले. तिच्याकडे वाद जमिनच उत्पन्नाचे साधन होते. वाद जमिन पुर्वी पासून मथीबाईच्या व वादीच्या ताब्यात आहे व आज देखिल आहे. प्रतिवादींनी वाद जमिनीत जाण्यास त्यांना मज्जाव केला म्हणून त्यांनी कागदपत्र काढले असता, त्यांना असे दिसले की, फेरफार क्र.१०९० अन्वये मथीबाईचे नाव काढून गोविंद नारायण संखे यांचे नाव नमूद केले आहे. तो फेरफार कलम ७०/ब अन्वये दाखल झालेल्या केस क्र. १८/१९६३ मधील दिनांक २९/०६/१९६५ रोजीच्या आदेशान्वये झालेला आहे. त्यानंतर त्यांना असेही दिसून आले की, फेरफार क्र.१०९० हा दिनांक २०/०४/१९६६ रोजीच्या आदेशान्वये रद्द झालेला आहे. त्या केस बद्दल कागदपत्रे तहसिलदार यांचेकडे अर्जाद्वारे मागीतले असता त्या कार्यालयाने कागदपत्र आढळून

येत नाही असा शेरा देवून त्यांचा अर्ज निकाली काढला. म्हणून ते मथीबाईचे वारस म्हणून वाद जमिनीतील कुळ आहेत. त्यांची परीस्थीती हालाखीची आहे म्हणून वाद जमिनीचा ताबा प्रतिवादी कडून त्यांना मिळणे जरुरीचे आहे कारण महसूल मधील नोंदी संशयास्पद आहेत व त्या प्रतिवादींच्या बाजूने नाहीत. सन २०१५ पर्यंत वाद जमिन तेच कसत होते. त्यामुळे वाद जमिनीवर प्रतिवादी यांचा असलेला ताबा बेकायदेशिर आहे. सन २०१८ मध्ये वादींनी कागदपत्रे काढली तरी वाद जमिनीमध्ये प्रतिवादी त्यांना जाऊ देत नाहीत. अश्या प्रकारे प्रतिवादी हे त्यांचा हक्क डावलतात म्हणून दाव्याचा निकाल लागे पर्यंत वादींनी जातांना प्रतिवादींनी आडी अडथळा करु नये वाद जमिन कोणासही विकू नये किंवा हस्तांतरीत करु नये, विकसीत करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूम प्रतिवादी विरुध्द मिळावा अशी वादी यांनी विनंती केली.

**०४.** प्रतिवादी क्र.१ याने हजर होवून आपली लेखी कैफियत व या अर्जास उत्तर नि.क्र.१५ दाखल केली. प्रतिवादी क्र. २ व ७ यांनी हजर होवून आपली लेखी कैफियत व या अर्जास उत्तर नि.क्र.२२ दाखल केली. तर प्रतिवादी क्र. ३ ते ६ व ८ ते १० यांनी हजर होवून आपली लेखी कैफियत व या अर्जास उत्तर म्हणून पुरसिस नि.क्र. २३ दाखल केली व प्रतिवादी क्र.१ ने दाखल केलेली लेखी कैफीयत नि.क्र. १५ आपलीही असल्याचे समजण्यात यावे असे नमूद केले.

**०५.** सर्व प्रतिवादींनी वादींचे कथन नाकारले व त्यांनी पुढे नमूद केले की, वादी हे मयत रामाचे वारस नाहीत. कारण वादी ठकीबाईचा सुलेमान शेख नावाच्या मुस्लीम व्यक्ती बरोबर विवाह झाला होता. वादी ठकीबाई पेक्षा वादी गुलाब हा १३ वर्षांनी लहान आहे त्यामुळे तिने त्याला जन्म दिल्याचे विश्वासनीय नाही.

**०६.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, मथीबाई किंवा वादींचे कोणतेही पुर्वज वाद जमिनीचे कुळ नव्हते किंवा वाद जमिन त्यांच्या ताब्यात नव्हती व वादींच्याही ताब्यात नाही. मयत रामा हा सन १९५३-५४ पुर्वी वाद जमिन कसत होता. पण प्रत्यक्ष कृषक दिनाच्या दिवशी गोविंद नारायण संखे हा कुळ म्हणून कसत होता व लागवड करीत होता. त्यामुळे मयत गोविंद यांनी शेतजमिन न्यायाधिकरण, पालघर यांच्याकडे मुंबई कुळ वहिवाट आणि शेतजमिन अधिनियमाचे (यानंतर **सदर अधिनियम** असा उल्लेख) कलम ७० ब नुसार केस क्र. १८/१९६३ हा अर्ज दाखल केला होता. तो अर्ज दिनांक २९/०६/१९६५ रोजी निकाली निघाला व गोविंद यास वाद जमिनीचे कुळ ठरविण्यात आले. यावरुन फेरफार क्र. १०९०

दिनांक २६/१२/१९६८ मंजूर झाला. या शेत जमिन न्यायाधिकरणाच्या आदेशाला मा. महाराष्ट्र जमिन महसूल न्यायाधिकरण, यांच्याकडे टेनेन्सी अपील क्र. ८४/१९६७ प्रमाणे मथीबाईने आव्हान दिले. त्यामध्ये सन १९७० मध्ये निकाल लागला व तो मथीबाईच्या विरोधात गेला. त्यानंतर मथीबाईने, मयत रामाने व वादींनी आजपर्यंत त्या आदेशास आव्हान दिले नाही. म्हणून फेरफार क्र. ५७० दिनांक १३/१२/१९७० रोजी या आदेशाप्रमाणे रद्द झाला व तो आजही अबाधित आहे. त्यानंतर कुळाची किंमत ठरविण्याची प्रक्रिया पार पडली व रुपये २५१३ किंमत ठरली आणि ती मयत गोविंद याने दिनांक ०४/०८/१९८७ रोजी तहसिलदार पालघर यांच्याकडील प्रकरण क्र. एएलटी/३२/एम/एसआर- ३०७९ मध्ये भरुन ३२ -म चे प्रमाणपत्र मिळविले. त्याप्रमाणे फेरफार क्र. ९४६ महसूल दप्तरी दिनांक १०/०६/१९८७ रोजी मंजूर झाला.

**०७.** प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर मथीबाईने भुमी सेनेने मार्फत मा. उच्च न्यायालयात तक्रारी अर्ज दाखल केला. तो अर्ज मा. उच्च न्यायालयाने सु-मोटो रिट पिटीशन क्र. ९८२/१९८८ म्हणून दाखल करुन घेतला. त्यामध्ये मयत रामाने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते व नमूद केले होते की, वाद जमिन कुळ म्हणून मथीबाईकडे होती, पण खंडाची रक्कम तिने न दिल्याने जमिन मालकाने तिची टेनेन्सी रद्द केली व मथीबाईकडून वाद जमिनीचा ताबा सन १९५२-५३ च्या सुमारास घेतला. मयत रामाने असेही नमूद केले होते की, तेव्हापासून प्रतिवादीचे पुर्वज गोविंद हे वाद जमिन कसत होते व कुळ होते. या रिट पिटीशनमध्ये मा. उच्च न्यायालयाने तत्कालिन उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांचा अहवाल मागविला होता व चौकशी अंती दिनांक ३०/०७/२००८ रोजी त्यामध्ये निकाल दिला व ती मागणी म्हणजेच रिट पिटीशन फेटाळली. या आदेशास मयत मथीबाई, रामा व वादींनी पुन्हा वरील न्यायालयात आव्हान दिले नाही. वाद जमिन आजही प्रतिवादी यांचे ताब्यात आहे व ही बाब वादीला मान्य आहे. म्हणून अर्ज मंजूर केल्यास आपले अपरीमित नुकसान होईल असे कथन करुन अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली.

**०८.** पटलावरील उपलब्ध कथनावरुन माझ्या समोर पुढील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी खालील प्रमाणे कारणमिमांसेसह नोंदवत आहे.

| प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीने प्रथमदर्शनी त्याची केस सिध्द केली आहे काय ? | –नाही. |
| २ | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | –नाही. |
| ३ | अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होईल काय ? | – नाही. |
| ४ | आदेश काय ? | –अंतीम आदेशा प्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०९.** वादींनी आपल्या कथनाच्या पुष्टयर्थ पटलावर दस्ताऐवजाची यादी नि.क्र.०३ वर १३ दस्त दाखल केलेले आहेत. तर, प्रतिवादींतर्फे पटलावर यादी नि.क्र. १७ वर १० दस्त दाखल केलेले आहेत. वादी व प्रतिवादींच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. त्यांनी आपआपल्या कथनाप्रमाणे व पटलावरील कागदपत्राप्रमाणे युक्तीवाद केला.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीताः–**

**१०.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने त्यांचा एकत्रीतरित्या विचार करण्यात येतो.

**११.** वाद जमिनीचा संरक्षीत कुळ कोण आहे किंवा कुळ कोण आहे याबाबत या प्रकरणात वाद आहे. वादींचे असे म्हणणे आहे की, मयत मथीबाई वाद जमिन कसत होती व त्यामुळे तिला संरक्षीत कुळ म्हणून दर्जा मिळाला आणि फेरफार क्र. ५७० हा दिनांक २०/१२/१९४९ रोजी मंजूर झाला. मान्यता हे दाखविण्यासाठी वादींनी पटलावर कागदपत्राची यादी निक्र. ०३ सोबत ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. यावरुन असे दिसते की, मयत मथीबाई आणि प्रतिवादींचे पुर्वज गोविंद या दोघांचेही नाव त्यात नमूद आहे. यातील नोंदी कशाच्या आधारे झाल्या हि बाब तपासण्यासाठी पटलावरील इतर कागदपत्रे तपासणे आवश्यक आहे. कारण सन १९९३–९४ पर्यंत या दोघांच्या नावाने नोंदी आहेत असे या ७/१२ उतारा मधील नोंदीवरुन दिसते. याच कागदपत्राच्या यादी सोबत वादीने हक्काच्या पत्रकाची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. यावरुन असे दिसते की, मयत मथीबाई ही वाद मिळकत खंडाने लागवड करते म्हणून तिची संरक्षीत कुळ म्हणून दिनांक २०/१२/१९४९ रोजी नोंद घेण्यात आली. त्याबरोबरच याच यादीतील

फेरफार विगतवारीच्या प्रतिवरुन असे दिसते की, मयत मथीबाई हिला संरक्षीत कुळ म्हणून अनु.क्र. ०४ वर नमूद केलेले आहे. म्हणजेच फेरफार क्र. ५७० अन्वये सन १९४९ मध्ये मयत मथीबाईही वाद जमिनीची संरक्षीत कुळ झाली व ती वाद जमिन कसत होती हि बाब वादींनी प्रथमदर्शनी दाखवून दिलेली आहे. कारण या सर्व कागदपत्राच्या नोंदी चुकीच्या आहेत हे दाखविण्यासाठी याक्षणी प्रतिवादी तर्फे कोणताही कागद पटलावर दाखल करण्यात आलेला नाही.

**१२.** पण, या अनुषंगाने प्रतिवादींचे असे कथन आहे की, सन १९६५ मध्ये शेत जमिन प्राधिकरण पालघर यांनी टेनेन्सी केस नं. १८/१९६३ मध्ये निकाल दिला व मयत गोविंद नारायण संखे यांना वाद जमिनीचे कुळ म्हणून घोषित करण्यात आले. त्या प्रकरणात मयत मथीबाई पक्षकार होती. त्या निकालाच्या विरोधात मथीबाईने किंवा मयत रामाने आपल्या हायातीममध्ये आव्हान दिले होते. पण त्यात ते अपयशी झाले व पुढे त्यांनी त्या आदेशाला आव्हान दिले नाही. प्रतिवादीतर्फे यादी नि.क्र.१७ वर सदर प्रकरणातील शेतजमीन प्राधिकरण पालघर यांच्या दिनांक २९/०६/१९६५ रोजीच्या निकालाची प्रत दाखल केली. या प्रतिवरून असे दिसते की, तो अर्ज प्रतिवादींचे पूर्वज गोविंद नारायण संखे यांनी जमिनीचे मालक वृजलाल व रमेशचंद्र आणि मथीबाईच्या विरोधात दाखल केला होता. तसेच असेही दिसते की, तो अर्ज सदर अधिनियमाच्या कलम ७० (ब) नुसार दाखल करण्यात आला होता आणि तो मंजूर झाला व प्रतिवादींचे पूर्वज गोविंद नारायण संखे यांना वाद जमिनीचे कुळ म्हणून घोषित करण्यात आले होते. याच यादी सोबत प्रतिवादींनी टेनेन्सी अपील क्र.१५८/१९६६ मधील दिनांक २८/०७/१९६६ रोजीच्या आदेशाची प्रत दाखल केली आहे. यावरून असे दिसते की, शेतजमीन प्राधिकरणाच्या वरील आदेशाला मयत मथीबाई हिने आव्हान दिले होते व त्यामध्ये प्रतिवादीचे पूर्वज गोविंद आणि जमीन मालकांना पक्षकार केले होते. असेही दिसते की, दिनांक २८/०७/१९६६ रोजी सदर अपील फेटाळण्यात आले. याच यादी सोबत प्रतिवादींनी महाराष्ट्र महसूल प्राधिकरण, मुंबई यांच्यासमोरील टेनेन्सी अपील क्र.९४/१९६७ मधील दिनांक १३/१२/१९६७ रोजी पारित झालेल्या आदेशाची प्रत दाखल केलेली आहे. या प्रतिवरून असे दिसते की, वर झालेल्या दिनांक २८/०७/१९६६ रोजीच्या आदेशाला मयत मथीबाई हिने आव्हान दिले होते. पण ही अपीलही फेटाळण्यात आली.

**१३.** मान्यता:, या अपीलमध्ये ती हजर राहिली नसल्यामुळे ती फेटाळण्यात आली असेही आदेशात नमूद आहे. त्याबरोबरच प्रतिवादी तर्फे पाटलावर मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्यासमोरील सू-मोटू रिट पीटीशन नं.९८२/१९८८ मधील दिनांक ३०/०७/२००८ च्या आदेशाची प्रत दाखल करण्यात आली. या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसते की, भूमी सेनेच्या कार्यकर्त्याने मा.उच्च न्यायालयाला तक्रार अर्ज केला होता व त्यामध्ये वाद जमिनीच्या कुळसंदर्भात मयत मथीबाईची बाजू मांडण्यात आली होती. असेही दिसते की, मथीबाई ही सन १९७७ मध्ये मरण पावली, रामा दिनांक २७/०३/२००० रोजी मरण पावला व त्याची पत्नी दिनांक १५/११/२००७ रोजी मरण पावली असे निरीक्षण नोंदविलेले आहे. त्याबरोबरच, मा.महाराष्ट्र महसूल प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशानंतर मथीबाईने किंवा रामा व त्याच्या पत्नीने आव्हान दिले नाही असे गृहीत धरून त्या आदेशाप्रमाणे वाद संपुष्टात आला असेही माननीय न्यायालयाने गृहीत धरले. म्हणजेच, वरील दोन्ही अपीलात मयत मथीबाई हिला यश प्राप्त झाले नाही आणि ती मयत झाल्यानंतर त्याच मुद्यावर म्हणजेच तिने पुढे आव्हान दिले नाही, या मुद्यावर सदरची रिट पिटिशन फेटाळण्यात आली असे दिसते. म्हणजेच, शेतजमीन प्राधिकरण पालघर यांचा दिनांक २९/०६/१९६५ रोजीचा मयत गोविंद नारायण संखे याला वाद जमिनीचा कुळ घोषित करणारा आदेश आजही कायम आहे असे प्रथम दर्शनी दिसते.

१४. प्रतिवादींचे असेही कथन आहे की मयत गोविंद नारायण संखे यांना कुळ घोषित केल्यानंतर वाद जमिनीची किंमत ठरविण्याची प्रक्रिया झाली व ती रक्कम भरल्यामुळे त्यांच्या नावाने सदर अधिनियमाचे कलम ३२ म अंतर्गत खरेदीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले. कागदपत्राची यादी नि.क्र. १७ वर प्रतिवादी तर्फे सदर प्रमाणपत्राची छायांकित प्रत दाखल करण्यात आली. या प्रतिवरून असे दिसते की, वाद जमिनीची खरेदीची किंमत भरल्यानंतर मयत गोविंदला तसे खरेदीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले होते. तसेच प्रतिवादींनी याच यादीसोबत खरेदी किंमत देण्यासंबंधीच्या दिनांक २०/१२/१९७४ रोजीच्या आदेशाची प्रत आणिक्र चलनाचा नमुना या फॉर्मद्वारे खरेदी रक्कम भरल्याबद्दल कागदपत्र दाखल केले. या दोन्ही वरून असे दिसते की, दिनांक २२/१२/१९७४ रोजी मयत गोविंद यांनी खरेदीची रक्कम रुपये ३६७०/- चलना द्वारे भरली होती.

**१५.** वरील विवेचनावरून एकंदरीत रित्या असे दिसते की, मयत मथीबाई ही सन १९४९ मध्ये वाद जमिनीची कूळ होती हे वादीने प्रथम दर्शनी दाखवून दिले असले तरी त्यानंतर तिचे कुळ रद्द करण्यात आले व वाद जमिनीचा कुळ म्हणून मयत गोविंद संखेला सन १९६५ मध्ये घोषित करण्यात आले ही बाब प्रतिवादींनी या क्षणी दाखवून दिलेली आहे.

**१६.** या अर्जामध्ये वादींची अशी मागणी आहे की, वादजमिनीवर जाण्यास प्रतिवादींनी मज्जाव करू नये, वादजमिन प्रतिवादींनी कोणासही विक्री करु नये किंवा हस्तांतरण करु नये, स्वरुप बदलू नये किंवा बांधकाम करू नये याबद्दल प्रतिवादीविरूध्द तात्पुरता मनाईहुकूम मिळावा. या मागणीवरुनच असे दिसते की, वादजमिन ही सध्याला प्रतिवादीच्या ताब्यात आहे असे वादीला म्हणावयाचे आहे. त्याबरोबरच या अर्जातील परिच्छेद क्र. १६ मध्ये याबाबत नमूद आहे. त्याबरोबरच परिच्छेद क्र. ७ मध्ये असेही नमूद आहे की, सन २०१८ पासून प्रतिवादी हे वादींना दावा मिळकतीवर जाऊ देत नाहीत. वादीच्या वकिलांनी आपल्या तोंडी युक्तीवादादरम्यान मान्य केले की, वादजमिन ही सध्याला प्रतिवादींच्या ताब्यात आहे. म्हणजेच, आज रोजी वादजमिनीवर प्रतिवादींचा ताबा आहे असे प्रथमदर्शनी दिसते.

**१७.** वादींचे असे कथन आहे की, सन १९६५ मध्ये मयत गोविंदच्या नावाने कुळ लावण्याचा जो आदेश झाला व त्यानंतर जो फेरफार झाला तो बेकायदेशिर आहे. कारण, प्रतिवादीच्या पुर्वजांनी महसुल खात्याची दिशाभुल करून किंवा संबंधीत तलाठी व तत्कालीन मंडळ अधिकारी यांचेशी वादींच्या उपरोक्श व वादींना कोणतीही चाहुल लागू न देता बोगस व बनावट कागदपत्राच्या आधारे वादजमिन आपल्या नावे करून घेतली. म्हणजेच, त्यावेळी दाखल झालेली कागदपत्रे ही बोगस व बनावट होती आणि ती खोटी होती याबद्दल तशी उपलब्धता नाही असे वादींच्या वकिलांनी आपल्या युक्तीवादात नमूद केले. तर, यावर प्रतिवादींचे असे कथन आहे की, मयत मथीबाई ही जमिन मालकाला खंड देत नसे म्हणून सदर अधिनियमाच कलम ७० (ब) अंतर्गत तो अर्ज दाखल झाला होता व सुनावणीनंतर मयत गोविंदला कुळ घोषीत करण्यात आले आणि ती कायदेशिर प्रक्रिया होती. मान्यताः, या अनुषंगाने वरिल परिच्छेदामध्ये महसूल प्राधिकरण, पालघर यांचा व त्यानंतर झालेल्या अपीलामधील आदेशांचा उहापोह अगोदरच झालेला आहे. या व्यक्तिरीक्त पटलावरील इतर कागदपत्र तपासावी लागतील.

**१८.** वादीच्या वकिलांनी आपल्या युक्तीवादा दरम्यान प्रतिवादींनी नि.क्र.१७ वर दाखल केलेल्या कागदपत्रातील धारा भरलेल्या खंडाच्या तीन पावत्याकडे माझे लक्ष वेधले. त्यांचे असे म्हणणे आहे की, त्या पावत्या बनावट आहेत. कारण, सन २०११–१२, सन २०१३–१४ आणि सन २०१२–१३ या वर्षाचा खंड भरल्याच्या त्या पावत्या आहेत असे दिसते पण, त्यावर अटेस्टेड म्हणून उप विभागीय अधिकारी यांची दि.११/०४/१९८८ ची सही व त्याखाली पदाचा शिक्का दिसतो. या अनुषंगाने सदर पावत्यांचे अवलोकन केले असता ती स्थिती असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्याबरोबरच, वादींतर्फे पटलावर दाखल करण्यात आलेल्या याच यादीतील यादी नि.क्र.३ वरील फेरफार विगतवारी मधील नोंद क्र. १० मधील फेरफार क्र. १०९० च्या अनुषंगाने असलेली नोंद सुध्दा असे दर्शविते की, सदर अधिनियमाचे कलम ७० (ब) प्रमाणे झालेल्या निकालाच्या अनुषंगाने मयत गोविंद यांचे नाव ...... म्हणुन दाखल केले असा शेरा आहे. मान्यता:, हा शेरा गोविंद संखेचे नाव नेमके काय म्हणुन अंतर्भुत करण्यात आले याबद्दल स्पष्ट नाही व ती जागा रिकामी आहे. या व्यक्तीरिक्त पटलावर सध्या तरी इतर कोणताही पुरावा नाही. पण, माझ्या मते, याक्षणी एवढाच पुरावा वादीला मदत करू शकणार नाही. कारण, या सर्व बाबतीत किंवा मयत मथीबाईच्या कुळाबाबत सदर महसुल प्राधिकारणाचा आदेश, अपीलातील आदेश आणि मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोरील रिट पीटीशन मधील आदेश प्रतिवादींच्या वतीने पटलावर दाखल करण्यात आले व हे सर्व आदेश मयत मथीबाईच्या विरोधात आहेत. त्यामुळे याक्षणी तरी या सर्व आदेशांना बगल देऊन वादींची केस प्रथमदर्शनी आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. प्रतिवादींनी काय कागदपत्र वापरले व ते कसे होते हा पुराव्याचा भाग आहे.

**१९.** आपण मयत मथीबाईचा मुलगा रामाचे वारस आहोत असे वादींचे कथन आहे. पण, प्रतिवादींनी ते नाकारले. माझ्या मते, याबाबत सध्याला प्रतिवादींकडे कोणताही कागदपत्री पुरावा नाही. साक्षीदारांचे शपथपत्र यासंबंधाने दाखल असले तरी, तो पुराव्याचा भाग राहील व दोन्हीं बाजूंना उलटतपासणीची संधी मिळाल्यानंतर संबंधीत बाब समोर येईल. त्यामुळे यावर याक्षणी भाष्य करणे योग्य राहणार नाही. दुसरी बाब अशी की, वादींचा दावा मुदतीत नाही असे प्रतिवादींचे कथन आहे. मान्यता:, मुदतीचा मुद्दा कायदा आणि तथ्य या दोन गोष्टींवर या प्रकरणात निकाली निघणे गरजेचे दिसते.

**२०.** अशा प्रकारे असे म्हणता येते की, वादींची प्रथमदर्शनी केस नाही आणि अनुकुलतेचा कल त्यांच्या बाजूने नाही व वादींचा अर्ज नामंजूर केल्यास त्यांचे याक्षणी अपरिमीत नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींचे नुकसान होऊ शकते. येणेप्रमाणे मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष मी नाकारार्थी काढुन मुद्या क्र.४ चा निष्कर्ष म्हणून खालील आदेश पारीत करत आहे :-

**- आदेश -**

वादीचा अर्ज नि.क्र.०५ नामंजूर करण्यात येतो.

सही/-

**(सतीश या. कदम)**

दिनांक : १२/०१/२०२३ २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,

ठिकाण : पालघर. पालघर.